सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा - 2016
परीक्षा दिनांक - 6 ऑक्टोबर, 2016

प्रश्नपुस्तिका क्रमांक
**BOOKLET No.**

200717

2016 Code : **L08**

# A

## प्रश्नपुस्तिका – II

## सामान्य ज्ञान, बुद्धिमापन व विषयाचे ज्ञान

**वेळ : 1 (एक) तास**

**एकूण प्रश्न : 100**
**एकूण गुण : 100**

# सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे     शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

1. वस्तु व सेवा कर (GST) विधेयकाबाबत खालील विधाने विचारात घ्या :
   अ. ते 122 वे घटनादुरुस्ती विधेयक होते.
   ब. ते 101 वे घटनादुरुस्ती अधिनियम 2016 आहे.
   क. जी.एस.टी. विधेयकाला मान्यता देणारे आसाम हे पहिले राज्य होते.
   ड. जी.एस.टी. विधेयकाला मान्यता देणारे राष्ट्रीय लोकशाही आघाडी-रहित (Non-NDA) बिहार हे पहिले राज्य होते.
   (1) विधाने अ, ब आणि क बरोबर (2) विधाने ब, क आणि ड बरोबर
   (3) विधाने अ आणि क बरोबर (4) विधाने अ, ब, क आणि ड बरोबर

   Consider the following statements about GST Bill :
   a. It was the $122^{nd}$ Constitutional Amendment Bill.
   b. It is $101^{st}$ Constitutional Amendment Act 2016.
   c. Assam was the first State to ratify GST Bill.
   d. Bihar was the first non-NDA State to ratify GST Bill.
   (1) Statements a, b and c are correct (2) Statements b, c and d are correct
   (3) Statements a and c are correct (4) Statements a, b, c and d are correct

---

2. महाराष्ट्राच्या 'व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन मिशन' बाबत खालील विधाने विचारात घ्या :
   अ. सदरहू योजना ही खाजगी कंपन्यांच्या सहाय्याने खेडयांच्या सर्वांगीण विकास करण्याबाबत आहे.
   ब. पहिला टप्प्यात 1000 गांवे ही 'मॉडेल व्हिलेज' करण्यासाठी निवडण्यात येतील.
   क. त्यापैकी 50% गांवे ही सहभागी कॉर्पोरेट कंपन्या निवडणार आहेत.
   ड. उर्वरीत 50% गांवे ही आदिवासी असतील.
   वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?
   (1) अ, ब आणि क (2) ब, क आणि ड (3) अ, क आणि ड (4) वरील सर्व

   Consider the following statements about 'Village Social Transformation Mission' of Maharashtra :
   a. This scheme is about comprehensive development of villages with the assistance of private companies.
   b. At first stage, 1000 villages are selected for 'Model Village'.
   c. 50% of the villages are selected by participated corporate companies.
   d. Remaining 50% villages are from tribal.
   Which of the above statements are correct ?
   (1) a, b and c (2) b, c and d (3) a, c and d (4) All of the above

3. रेल्वेमंत्री सुरेश प्रभु यांनी कोणत्या राज्यात देशातील पहिल्या 'हरित रेल्वे कॉरिडॉर' चे उद्घाटन केले आहे ?

(1) जम्मू-काश्मीर (2) झारखंड

(3) तामिळनाडू (4) महाराष्ट्र

In which State, the Railway Minister, Suresh Prabhu inaugurated the nation's first 'Green Rail Corridor' ?

(1) Jammu-Kashmir (2) Jharkhand

(3) Tamilnadu (4) Maharashtra

---

4. खालीलपैकी कोणत्या उद्यान/प्रकल्पाने '2016 चे भारत जैवविविधता पारितोषिक' (India Biodiversity Award) मिळविलेले आहे ?

(1) कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान (उ.प्र.)

(2) काझीरंगा राष्ट्रीय उद्यान (आसाम)

(3) रणथम्भौर राष्ट्रीय उद्यान (राजस्थान)

(4) पाक्के व्याघ्र प्रकल्प (अरुणाचल प्रदेश)

Which Park/Reserve received the 'India Biodiversity Award-2016' ?

(1) Corbette National Park (U.P.)

(2) Kazirunga National Park (Assam)

(3) Ranthambore National Park (Rajasthan)

(4) Pakke Tiger Reserve (Arunachal Pradesh)

---

5. जगातील सर्वाधिक उंच व लांब असा काचेचा पुल नुकताच चीनमध्ये प्रेक्षकांसाठी उघडण्यात आला जो

अ. 430 मीटर लांब

ब. 10 मीटर रुंद

क. 300 मीटर जमिनीपासून उंच

ड. दररोज जास्तीत जास्त 8000 प्रेक्षकांना तो पार करण्यासाठी परवानगी

(1) अ, ब आणि क बरोबर (2) अ, क आणि ड बरोबर

(3) ब, क आणि ड बरोबर (4) अ, ब आणि ड बरोबर

The world's longest and highest glass bridge opened to visitors recently in China, which is

a. 430 metre long

b. 10 metre wide

c. 300 metre above the ground

d. Allows a maximum of 8000 visitors to cross the bridge every day

(1) a, b and c are correct (2) a, c and d are correct

(3) b, c and d are correct (4) a, b and d are correct

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

6. खालील विधाने विचारात घ्या :

अ. न्यायमूर्ति मंजूळा चेल्लूर यांची नुकतीच बॉम्बे (मुंबई) उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ति म्हणून नियुक्ती झाली आहे.

ब. न्यायमूर्ति चेल्लूर या बॉम्बे (मुंबई) उच्च न्यायालयाच्या दुसऱ्या महिला मुख्य न्यायमूर्ति ठरतील.

क. न्यायमूर्ति चेल्लूर या मद्रास (चेन्नई) उच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला मुख्य न्यायमूर्ति होत्या.

ड. न्यायमूर्ति चेल्लूर या कर्नाटक उच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायमूर्ति होत्या.

(1) विधाने अ, ब आणि ड बरोबर

(2) विधाने अ, ब आणि क बरोबर

(3) विधाने अ, ब, क आणि ड बरोबर

(4) विधाने अ, क आणि ड बरोबर

Consider the following statements :

a. Justice Manjula Chellur was appointed as the Chief Justice of Bombay (Mumbai) High Court recently.

b. Justice Chellur will be the second woman Chief Justice of Bombay (Mumbai) High Court.

c. Justice Chellur was the first woman Chief Justice of Madras (Chennai) High Court.

d. Justice Chellur was the first female Judge of Karnataka High Court.

(1) Statements a, b and d are correct

(2) Statements a, b and c are correct

(3) Statements a, b, c and d are correct

(4) Statements a, c and d are correct

---

7. खालीलपैकी कोणत्या भारतीयाच्या जन्मशताब्दी स्मरणार्थ संयुक्त राष्ट्राने तिकीट काढले आहे ?

(1) एम.एस. सुब्बुलक्ष्मी
(2) भीमसेन जोशी
(3) श्रीनिवास रामानुजन
(4) सुब्रमन्य भारती

The United Nations has issued a stamp to mark the birth centenary of who among the following Indians ?

(1) M.S. Subbulakshmi
(2) Bhimsen Joshi
(3) Srinivasa Ramanujan
(4) Subramania Bharati

8. कोणत्या मिसाइल निर्देशित विध्वंसक युद्धनौकेचे मुंबईमधे 17 सेप्टेंबर, 2016 ला जलावतरण करण्यात आले ?

(1) जेडीएस कोंगो (2) कनमिंग
(3) फारबिन (4) मोरमुगाओ

Which guided Missile Destroyership was launched in Mumbai on 17th September, 2016 ?

(1) JDS Kongo (2) Kunming
(3) Forbin (4) Mormugao

---

9. एस.बी.आय. म्युच्युअल फंडाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी कोणाची नियुक्ति करण्यात आली आहे ?

(1) इंद्रा नुयी (2) अनुराधा राव
(3) मेग विटमेन (4) मेरी बर्रा

Who is appointed as the CEO of SBI Mutual Fund ?

(1) Indra Nooyi (2) Anuradha Rao
(3) Meg Whitman (4) Mary Barra

---

10. योग्य कथने ओळखा :

अ. जनगणना 2011 नुसार, महाराष्ट्रामध्ये साक्षरता दर 82·91% आहे.
ब. जनगणना 2011 नुसार, महाराष्ट्रामध्ये जनसंख्येची घनता 365 प्रति चौ. किमी. आहे.
क. जनगणना 2011 नुसार, केरळमध्ये साक्षरता दर 93·91% आहे.

(1) कथने अ आणि ब
(2) कथने ब आणि क
(3) कथने अ आणि क
(4) वरील सर्व

Select the correct statements :

a. According to Census 2011, Literacy rate in Maharashtra is 82·91%.
b. According to Census 2011, Population density in Maharashtra is 365 per sq. km.
c. According to Census 2011, Literacy rate in Kerala is 93·91%.

(1) Statements a and b
(2) Statements b and c
(3) Statements a and c
(4) All of the above

11. सात मुली वर्तुळाकारात केंद्राकडे तोंड करून बसल्या आहेत. तानी, वाणी, रइसा, कॅटी, जया, पन्ना आणि साथी अशी त्यांची नावे असून ही यादी त्यांच्या बैठकीच्या क्रमानुसार आहे, असे नाही. तानी आणि जया वगळता कोणीतरी साथी व कॅटीच्या दरम्यान बसली आहे. पन्ना ही वाणीच्या डावीकडून दुसरी आहे आणि रइसा पन्नाच्या उजवीकडून पाचवी आहे. जया, पन्ना किंवा वाणी बरोबर जोडी करू शकते.

जर जया व रइसा यांनी जागांची अदलाबदल केली तर पुढे दिलेल्या कोणत्या दोन मुली एकत्र काम करण्यासाठी जोडी करू शकणार नाहीत ?

(1) कॅटी – जया (2) साथी – जया (3) जया – तानी (4) रइसा – पन्ना

Seven girls are sitting in a circle facing towards the centre. They are Tani, Vani, Raisa, Katy, Jaya, Panna and Sathi and this list is not necessarily according to their sitting order. Someone is sitting between Sathi and Katy except Tani and Jaya. Panna is second to the left of Vani and Raisa is fifth to the right of Panna. Jaya can form a pair with Panna or Vani.

If Jaya and Raisa interchange their positions which of the following two girls will not be able to form a pair for working together ?

(1) Katy – Jaya (2) Sathy – Jaya (3) Jaya – Tani (4) Raisa – Panna

---

12. एका स्त्रीचा परिचय करून देताना व्यक्ती म्हणते, ती तिच्या आई-वडिलांची एकुलती एक मुलगी आहे आणि तिच्या आईच्या नवऱ्याची बहीण माझी आत्या आहे. मला भाऊ वा बहीण नाही. जर ही व्यक्ती पुरुष असेल तर या स्त्रीशी त्याचे नाते काय आहे ?

(1) चुलत भाऊ (2) भाऊ

(3) काका (4) मामा

Introducing a woman a person says, 'She is the only daughter of her parents and her mother's husband's sister is my paternal aunt. I don't have any brother or sister. How is the person related to that woman, if he is a male ?

(1) Cousin brother (2) Brother

(3) Paternal uncle (4) Maternal uncle

---


13. "निनाच्या आजोबांचा मुलगा हा निनाच्या भाच्याचा आजोबा असू शकतो" या विधानासंबंधात जर फक्त थेट नातेसंबंधाचाच विचार केला, तर योग्य निष्कर्ष निवडा.

(1) जर हा भाचा निनाच्या भावाचा किंवा बहिणीचा मुलगा असेल, तर हे विधान सत्य असेल.
(2) जर हा भाचा निनाच्या नवऱ्याच्या बहिणीचा मुलगा असेल, तर हे विधान सत्य असेल.
(3) जर हा भाचा निनाच्या नवऱ्याच्या भावाचा मुलगा असेल, तर हे विधान सत्य असेल.
(4) जर निनाचे आजोबा हे तिच्या आईचे वडील असतील, तर हे विधान सत्य असेल.

Select the correct conclusion with respect to the statement if only direct relationship is considered, "Nina's grand-father's son can be the grand-father of Nina's nephew."


(1) Statement is true if this nephew is a son of Nina's brother or sister.
(2) Statement is true if this nephew is a son of Nina's husband's sister.
(3) Statement is true if this nephew is a son of Nina's husband's brother.
(4) Statement is true if Nina's grandfather is her mother's father.

14. प्रश्न चिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?




(1) 938 (2) 1134 (3) 836 (4) 926

Which number will come in place of the question mark ?




(1) 938 (2) 1134 (3) 836 (4) 926

---

15. दिलेल्या आकृतीतील संख्या विशिष्ट सुत्रानुसार आहेत.

ताऱ्याच्या ठिकाणी कोणती संख्या येईल ?

| | | |
|---|---|---|
| 19 | 8 | 81 |
| 20 | 14 | 102 |
| 13 | 19 | ☆ |

(1) 92 (2) 96 (3) 94 (4) 106

The numbers in the given figure are according to some formula.

What number will come in place of the star ?

| | | |
|---|---|---|
| 19 | 8 | 81 |
| 20 | 14 | 102 |
| 13 | 19 | ☆ |

(1) 92 (2) 96 (3) 94 (4) 106

16. मणीने त्याचा मित्र नादिरला त्याच्या घरी भेटण्यासाठी स्वत:च्या घरापासून आग्नेय दिशेला 3 किमी गाडी चालवली. तेथून 5 किमी नैऋत्य दिशेने गाडी चालवून ते दोघे हेमूला त्याच्या घरी भेटले. तेथून ते तिघे मित्र 11 किमी ईशान्येला, 3 किमी वायव्येला आणि शेवटी 11 किमी नैऋत्येला गेले आणि तेथे ते थांबले. स्वत:च्या घराच्या सर्वात जवळ कोण आहे ?

(1) सामग्री पुरेशी नाही (2) हेमू
(3) मणी (4) नादिर

Mani drives 3 km to south-east from his home to meet his friend Nadir at his home. From there the two friends drive 5 km to south-west to meet Hemu at his home. From this point the three friends drive 11 km to north-east, 3 km to north-west and finally 11 km to south-west where they complete their drive.

Who is nearest to his own home ?

(1) Data is not sufficient (2) Hemu
(3) Mani (4) Nadir

---

17. कुटुंबात M, N, O, P, Q आणि R हे सहा सदस्य आहेत. O हा N चा मुलगा आहे, परंतु N ही व्यक्ती O ची आई नाही. N व P हे विवाहित जोडपे आहे. R हा N चा भाऊ आहे आणि Q ही P ची बहीण आहे. जर उरलेले सर्व सदस्य विवाहित जोडप्याची मुले असतील, तर P च्या अपत्यांची संख्या सांगणारा पर्याय निवडा.

(1) 1 (2) 2 (3) 3 (4) 1, 2, 3 पैकी नाही

In a family, M, N, O, P, Q and R are six members. O is the son of N but N is not the mother of O. N and P are married couple. R is the brother of N and Q is the sister of P. If all other members are children of married couples, then select the option which indicates the number of children of P.

(1) 1 (2) 2 (3) 3 (4) None of 1, 2, 3

---

18. शिबिरार्थींनी एका क्षेत्रात A, B, C, D, E, F, G, H व I हे 9 तंबू उभारले आहेत. G हा H च्या पश्चिमेला 1 किमी आहे तर D हा G च्या पूर्वेला 3 किमी अंतरावर आहे आणि F हा G च्या उत्तरेला 2 किमी अंतरावर आहे. I हा B व C यांच्या मधोमध आहे, तर E नेमका हा H व D यांच्या मधोमध आहे. C हा B च्या पूर्वेला 2 किमी अंतरावर आहे. A हा B च्या उत्तरेला 1 किमी अंतरावर आहे आणि H हा A च्या दक्षिणेला 2 किमी अंतरावर आहे G च्या संदर्भात I जवळपास ज्या दिशेला आहे, ती दिलेल्या पर्यायांमधून निवडा.

(1) ईशान्य (2) आग्नेय (3) दक्षिण (4) उत्तर

Campers have set up 9 tents A, B, C, D, E, F, G, H and I in a certain area. G is 1 km to the west of H while D is 3 km to the east of G and F is 2 km to the north of G. I is situated in the middle of B and C while E is just in the middle of H and D. C is 2 km to the east of B. A is 1 km to the north of B and H is 2 km to the south of A. Select the nearmost direction from the given alternatives in which I is with respect to G.

(1) North-East (2) South-East (3) South (4) North

**19.** 20 माणसांसाठी भाताचे 20 वाडगे उपलब्ध आहेत. प्रत्येक माणसाने तीन वाडग्यांपेक्षा कमी वा जास्त वाडगे भात खायचा नाही, असे ठरवले. सर्व स्त्रियांनी ठरवले की त्यांच्यापैकी प्रत्येकीने अर्ध्यापेक्षा जास्त किंवा कमी वाडगा भात खायचा नाही. मुलांना दोनपेक्षा कमी किंवा जास्त वाडगा भात खायचा नाही. अशी मुभा दिली. तर अनुक्रमे पुरुष, स्त्रिया व मुले असे एकूण 20 व्यक्ती असलेला असा गट निवडा, की जो भाताचे सर्व वाडगे संपवेल.

(1) 1, 16 and 3 (2) 2, 12 and 6 (3) 1, 14 and 5 (4) 1, 12 and 7

There are 20 bowls of rice for 20 people. Each male decided to eat neither less nor more than three bowls of rice and all women decided that each of them will eat neither less nor more than half bowl of rice. Children were allowed to eat neither less nor more than two bowls of rice. Select the correct combination of twenty persons including males, women and children respectively, which will finish all bowls of rice.

(1) 1, 16 and 3 (2) 2, 12 and 6 (3) 1, 14 and 5 (4) 1, 12 and 7

---

**20.** मनू, मानी, मंजू व माली यांनी अर्थविज्ञान व इतिहास चाचण्या दिल्या. पुढे दिलेली तथ्ये वापरून इतिहासात सर्वात कमी गुण मिळवणारी व्यक्ती निवडा.

तथ्ये :

- मनू एकटीच अर्थविज्ञानात अनुत्तीर्ण असून तिने इतिहासात सर्वाधिक गुण मिळवून त्याची कसर भरून काढली आहे.
- मानीने अर्थविज्ञानात मंजूवर मात केली आहे तर मंजू इतिहासात मानीपेक्षा उत्तम ठरली आहे.
- मालीने तिची अर्थविज्ञानातील कामगिरी सुधारून त्यात ती इतिहासापेक्षा एक क्रम वर आली आहे व मंजूला लागून वर आहे.

(1) मनू (2) मानी

(3) मंजू (4) माली

Manu, Mani, Manju and Mali appeared for economics and history tests. Using the facts given below select the person who secured least marks in history.

Facts :

- Manu is the only one who fails in economics but makes it up by securing top marks in history.
- Mani beats Manju in economics but Manju betters Mani in History.
- Mali improves her performance in economics by moving one rank higher than history and coming immediately above Manju.

(1) Manu (2) Mani

(3) Manju (4) Mali

21. महाराष्ट्राच्या सह्याद्री भागातील शिखर व जिल्हा यांच्या योग्य जोड्या लावा.

| *(शिखर)* | | | *(जिल्हा)* |
|---|---|---|---|
| अ. | मांगी - तुंगी | I. | सातारा |
| ब. | तोरणा | II. | नासिक |
| क. | कळसुबाई | III. | अहमदनगर |
| ड. | महाबळेश्वर | IV. | पुणे |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | I | IV |
| (2) | II | IV | III | I |
| (3) | II | I | IV | III |
| (4) | III | IV | I | II |

Match the following Peaks of the Sahyadris with the districts they are located in.

| *(Peaks)* | | | *(Districts)* |
|---|---|---|---|
| a. | Mangi-Tungi | I. | Satara |
| b. | Torna | II. | Nasik |
| c. | Kalsubai | III. | Ahamadnagar |
| d. | Mahabaleshwar | IV. | Pune |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | I | IV |
| (2) | II | IV | III | I |
| (3) | II | I | IV | III |
| (4) | III | IV | I | II |

---

22. खालील माहितीवरून खडक समूहाचे नाव ओळखा.

अ. संपूर्ण भंडारा व गोंदिया जिल्हा, नागपूर, रत्नागिरी व सिंधूदुर्ग यांचा काही भाग.

ब. साकोली व सौसर मालेतील अतिप्राचीन रूपांतरीत खडक.

क. साधारण कालखंड 400 कोटी वर्षांचा.

ड. महाराष्ट्रातील 10·5 टक्के क्षेत्र व्यापलेले आहे.

(1) कडप्पा प्रणाली  (2) डेक्कन ट्रैप

(3) कँब्रियन समूह  (4) विंध्ययन प्रणाली

Identify the rock-group from the information given below.

a. Occupies the districts of Bhandara and Gondia completely and those of Nagpur, Ratnagiri and Sindhudurg partially.

b. Ancient Metamorphic rocks of the Sakoli and Sausar series.

c. Belongs to a period of 400 crore years before.

d. Occupies 10·5% of the area in Maharashtra.

(1) Cudappah System  (2) Deccan Trap

(3) Cambrian Group  (4) Vindhyan System

23. महाराष्ट्रात तापी नदीचे खोरे कोणत्या डोंगररांगा दरम्यान आढळते ?

(1) सातमाळा अजंठा आणि हरिश्चंद्र बालाघाट रांगा

(2) सातपुडा आणि सातमाळा अजंठा रांगा

(3) सातपुडा आणि सह्याद्री रांगा

(4) हरिश्चंद्र बालाघाट आणि महादेव रांगा

Tapi river basin is found in which of the following mountain ranges in Maharashtra ?

(1) Satmala Ajantha and Harishchandra Balaghat ranges

(2) Satpuda and Satmala Ajantha ranges

(3) Satpuda and Sahyadri ranges

(4) Harishchandra Balaghat and Mahadeo ranges

---

24. महाराष्ट्रामध्ये आढळणारी अभयारण्ये/राष्ट्रीय उद्याने यांचा पुर्वेकडून पश्चिमेकडे असणारा क्रम सांगा.

(1) नवेगाव, चिखलदरा, अणेर, देवळगाव-रेहकुरी, फणसाड

(2) चिखलदरा, अणेर, नवेगाव, देवळगाव-रेहकुरी, फणसाड

(3) फणसाड, देवळगाव-रेहकुरी, चिखलदरा, अणेर, नवेगाव

(4) अणेर, देवळगाव-रेहकुरी, फणसाड, नवेगाव, चिखलदरा

Arrange the National Parks/Sanctuaries from east to west in Maharashtra.

(1) Navegao, Chikhaldara, Aner, Devalgao-Rehkuri, Fansad

(2) Chikhaldara, Aner, Navegao, Devalgao-Rehkuri, Fansad

(3) Fansad, Devalgao-Rehkuri, Chikhaldara, Aner, Navegao

(4) Aner, Devalgao-Rekuri, Fansad, Navegao, Chikhaldara

---

25. येरला नदी खोऱ्यातील खालीलपैकी कोणते जलसिंचन प्रकल्प आहेत ?

(1) वरुज, मायनी, भाकूचीवाडी

(2) वानगाव, वालूज, भांबरडे

(3) टाक, काकूरडे, अंतरी

(4) येळीव, शाळगाव, करडवळी

Which of the following are irrigation projects in Yerla river valley ?

(1) Varuz, Mayni, Bhakuchiwadi

(2) Vangaon, Valuz, Bhambarde

(3) Tak, Kakurde, Antri

(4) Yeliv, Shalgaon, Kardavali

---

26. 1851 मध्ये मुंबईत 'बॉम्बे स्पिनिंग ॲन्ड वीव्हिंग कंपनी' ही पहिली कापडगिरणी कोणी सुरू केली ?
(1) जमशेदजी टाटा (2) प्रेमचंद रायचंद
(3) दिनशा पेटीट (4) कावसजी दावर

Who established the first textile mill in Mumbai named as 'Bombay Spinning and Weaving Company' in 1851 ?
(1) Jamshedji Tata (2) Premchand Raychand
(3) Dinshaw Petit (4) Kavasji Dawar

---

27. भारताच्या आर्थिक स्थितिसंबंधी केलेल्या मुळगामी चिकित्सेमुळे कोणाला "आर्थिक राष्ट्रवादाचे प्रणेते" म्हटले जाते ?
(1) न्यायमूर्ति म.गो.रानडे (2) बाळ गंगाधर टिळक
(3) महात्मा ज्योतीबा फुले (4) दादाभाई नौरोजी

Who is called as the "Leader of Economic Nationalism" because of his fundamental analysis of the financial condition of India ?
(1) Justice M.G. Ranade (2) Bal Gangadhar Tilak
(3) Mahatma Jyotiba Phule (4) Dadabhiai Nauroji

---

28. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी 1895 मध्ये कोणता उत्सव सुरू केला ?
अ. शिवजयंती ब. गणेशोत्सव क. नवरात्र ड. राष्ट्रीय
(1) फक्त अ (2) फक्त ब (3) अ आणि ब (4) क आणि ड

Which festival was started by Lokmanya Bal Gaangadhar Tilak in 1895 ?
a. Shivjayanti b. Ganeshotsav c. Navratra d. Rashtriya
(1) Only a (2) Only b (3) a and b (4) c and d

---

29. गुजराती भाषेतून प्रसिद्ध झालेले मुंबईतील पहिले देशी भाषेतील वृत्तपत्र कोणते ?
(1) दर्पण (2) प्रभाकर
(3) सुधारक (4) मुंबई समाचार

Which is the first vernacular language newspaper published in Mumbai in Gujarati ?
(1) Darpan (2) Prabhakar
(3) Sudharak (4) Mumbai Samachar

---

30. क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारच्या सांगली गटाचे नेतृत्व कोणाकडे होते ?
(1) वसंतदादा पाटील (2) यशवंतराव चव्हाण
(3) पांडुरंग बोराटे (4) बापू कचरे

Who was given the leadership of Sangli group of Krantisingh Nana Patil's Pratisarkar ?
(1) Vasantdada Patil (2) Yashwantrao Charan
(3) Pandurang Borate (4) Bapu Kachare

---

31. भारत सरकार अधिनियम-1935 ची कोणती वैशिष्टये आहेत ?

अ. संघराज्य व प्रांतिक स्वायत्तता

ब. केन्द्रातील द्विशासन

क. द्विगृही केन्द्रीय कायदेमंडळ

ड. केन्द्र आणि प्रांत यांच्यात वैधानिक अधिकारांची विभागणी

(1) अ आणि ड

(2) अ, ब आणि ड

(3) अ, क आणि ड

(4) अ, ब, क आणि ड

Which are the features of Government of India Act, 1935 ?

a. Federation and Provincial autonomy

b. Dyarchy at the Centre

c. Bicameral Central Legislature

d. Distribution of Legislative powers between the Centre and the Provinces

(1) a and d

(2) a, b and d

(3) a, c and d

(4) a, b, c and d

---

32. खालीलपैकी कोणते विधान बरोबर ***नाही*** ?

(1) घटना समितीची पहिली बैठक 9 डिसेंबर 1946 रोजी भरली.

(2) डॉ. सच्चिदानंद सिन्हा हे घटना समितीचे तात्पुरते अध्यक्ष म्हणून निवडले गेले.

(3) जवाहरलाल नेहरूंनी 13 डिसेंबर 1946 रोजी 'उद्दिष्ठांचा ठराव' मांडला.

(4) 'उद्दिष्ठांचा ठराव' हा एक मताने 26 जानेवारी 1947 रोजी मंजूर झाला.

Which one of the following statements is ***not*** correct ?

(1) The Constituent Assembly held its first meeting on December 9, 1946.

(2) Dr. Sachchidanand Sinha was elected as the temporary President of the Constituent Assembly.

(3) Jawaharlal Nehru moved 'Objective Resolution' on December 13, 1946.

(4) The 'Objective Resolution' was unanimously adopted on January 26, 1947.

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

33. भारतीय राज्यघटना तयार करण्यासाठी भारतीय घटना समितीची एकूण किती अधिवेशने झाली ?

(1) 11 (2) 16

(3) 114 (4) 165

How many sessions of the Constituent Assembly of India were held to draft the Indian Constitution ?

(1) 11 (2) 16

(3) 114 (4) 165

34. आपल्या राज्यघटनेच्या सरनाम्याने 'विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा आणि ______ यांचे स्वातंत्र्य दिले आहे'.

(1) व्यवसाय (2) संघटना

(3) पूजा (4) संचार

The Preamble to our Constitution serves 'Liberty of thought, expression, belief, faith and ________.'

(1) profession (2) association

(3) worship (4) movement

35. राज्यघटनेच्या अनुच्छेद-51 मध्ये म्हटले आहे की, राज्य हे ________ यासाठी प्रयत्नशील राहील.

अ. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेचे संवर्धन करणे

ब. शांततापूर्वक सहअस्तित्वास प्रोत्साहन देणे

क. राष्ट्रांराष्ट्रांमध्ये न्यायसंगत व सन्मानपूर्ण संबंध राखणे

ड. आंतरराष्ट्रीय तंटे लवादाद्वारे मिटविण्यास प्रोत्साहन देणे

(1) अ, ब आणि क (2) ब, क आणि ड

(3) अ, क आणि ड (4) अ, ब, क आणि ड

Article 51 of the Constitution says that the State shall endeavor to __________.

a. promote international peace and security

b. encourage peaceful co-existence

c. maintain just and honourable relations between nations

d. encourage settlement of international disputes by arbitration

(1) a, b and c (2) b, c and d

(3) a, c and d (4) a, b, c and d

**36.** मूलभूत हक्कांबाबत खालील जोडया जुळवा :

| | *अ* *(कलम क्र.)* | | *ब* *(हक्क)* |
|---|---|---|---|
| अ. | कलम-14 | I. | धार्मिक व्यवहाराच्या व्यवस्थापनाचे स्वातंत्र्य |
| ब. | कलम-21 | II. | जीवित आणि व्यक्तिगत स्वातंत्र्य संरक्षण |
| क. | कलम-23 | III. | कायद्यासमोर समता |
| ड. | कलम-26 | IV. | मानवी व्यापारास प्रतिबंध |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | I | II | III | IV |
| (2) | III | II | IV | I |
| (3) | II | I | IV | III |
| (4) | IV | III | I | II |

Match the following pairs regarding Fundamental Rights :

| | *A* *(Articles)* | | *B* *(Rights)* |
|---|---|---|---|
| a. | Article – 14 | I. | Freedom to manage religious affairs |
| b. | Article – 21 | II. | Protection of life and personal liberty |
| c. | Article – 23 | III. | Right to Equality before law |
| d. | Article – 26 | IV. | Prohibition of traffic in human being |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | I | II | III | IV |
| (2) | III | II | IV | I |
| (3) | II | I | IV | III |
| (4) | IV | III | I | II |

---

**37.** भारतीय राज्यघटनेचे कलम क्रमांक 368 खालीलपैकी कोणत्या प्रकारे बदलता येते ?

(1) संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या साध्य बहुमताने

(2) संसदेच्या प्रत्येक सभागृहाच्या दोन तृतीयांश बहुमताने

(3) संसदेच्या प्रत्येक सभागृहाचे दोन तृतीयांश बहुमत आणि किमान 1/2 घटक राज्यांच्या विधीमंडळाच्या मान्यतेने

(4) ह्या कलमात दुरूस्ती करता येत नाही

Article 368 of the Indian Constitution can be amended by which of the following method ?

(1) Simple majority of both the Houses of Parliament

(2) Two-third majority of each House of the Parliament

(3) Two-third majority of each House of Parliament and ratification 1/2 of the State Legislatures

(4) This Article can't be amended

---

38. भारताच्या महालेखापालांना ________ यांच्या इतके वेतन मिळते.
(1) भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश
(2) भारताचे सरन्यायाधीश
(3) भारत सरकारच्या गृहमंत्रालयाचे सचिव
(4) भारताचे कॅबिनेट सचिव

The Comptroller and Auditor General of India receives salary equal to that of the ________.
(1) Judges of Supreme Court of India
(2) Chief Justice of India
(3) Secretary of Ministry of Home Affairs, Government of India
(4) Cabinet Secretary of India

39. भारतीय राज्यघटनेच्या कलम 171(1) नुसार विधानपरिषदेची सदस्य संख्या किती असावी ?
अ. विधानसभेच्या सदस्यसंख्येच्या 1/3 सदस्यांपेक्षा अधिक नसावी
ब. 40 पेक्षा कमी नसावी
क. राज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात असावी
ड. वरीलपैकी सर्व बरोबर

(1) अ बरोबर (2) अ आणि ब बरोबर
(3) ड बरोबर (4) सर्वच बरोबर

What is the composition and number of members in the Legislative Council as per Article 171 (1) of the Indian Constitution ?
a. It is not more than $1/3^{rd}$ of the total members of the Legislative Assembly
b. It is not less than 40
c. It is proportionate to the State population
d. All the above are correct

(1) a is correct (2) a and b is correct
(3) d is correct (4) All are correct

40. कोणत्या कलमान्वये भारतात सर्वत्र समान नागरी कायद्याच्या निर्मितीचा प्रयत्न करेल ?
(1) कलम 42 अन्वये (2) कलम 44 अन्वये
(3) कलम 50 अन्वये (4) कलम 51 अन्वये

Which Article of the Indian Constitution expressed that State should try to inact Uniform Civil Code in India ?
(1) Article 42 (2) Article 44
(3) Article 50 (4) Article 51

41. माहिती अधिकार अधिनियमाने पुढील कायद्याचे निरसन केले आहे.

(1) माहिती अधिनियम, 2001

(2) कार्यालयीन गुपिते अधिनियम, 1962

(3) जनमाहिती अधिनियम, 2003

(4) माहिती मिळविण्याचे स्वातंत्र अधिनियम, 2002

The Right to Information Act has repealed

(1) The Information Act, 2001

(2) The Official Secrets Act, 1962

(3) The Public Information Act, 2003

(4) The Freedom of Information Act, 2002

---

42. राज्य मुख्य माहिती आयुक्तांची आणि राज्य माहिती आयुक्तांची नियुक्ती राज्यपाल माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम __________ प्रमाणे करतील.

(1) 15(3)

(2) 14(1)

(3) 16(3)

(4) 13(2)

The State Chief Information Commissioner and the State Information Commissioner shall be appointed by the Governor as per Section ________ of the Right to Information Act, 2005.

(1) 15(3)

(2) 14(1)

(3) 16(3)

(4) 13(2)

---

43. माहिती अधिकार अधिनियम, 2005 मधील कोणत्या कलमानुसार न्यायालयांच्या अधिकारतेस आडकाठी करण्यात आलेली आहे ?

(1) कलम 18 (2) कलम 19

(3) कलम 20 (4) वरीलपैकी कोणते ही नाही

Under which Section of the Right to Information Act, 2005 there is bar of Jurisdiction of Courts ?

(1) Section 18 (2) Section 19

(3) Section 20 (4) None of the above

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

44. ______ कडून माहिती मिळविण्यासाठी माहितीच्या अधिकाराखाली केलेल्या अर्जासाठी कोणतेही शुल्क आकारले जाऊ शकत ***नाही*** ?

(1) केंद्रीय मंत्री

(2) शासकीय अधिकारी

(3) दारिद्र्यरेषेखालील व्यक्ति

(4) विदेशी नागरिक

No fees shall be charged from the persons who are ________ for an application made under RTI Act, to obtain the Information.

(1) Union Ministers

(2) Government officers

(3) below poverty line

(4) foreigners

---

45. "माहितीचा अधिकार" या व्याख्येत याचा समावेश होत ***नाही.***

(1) दस्तऐवजाची प्रमाणित प्रत घेणे

(2) मालाचे प्रमाणित नमूने घेणे

(3) प्रश्न विचारणे

(4) कामाची किंवा दस्तऐवजाची तपासणी

Definition of "Right to Information" does ***not*** include

(1) Taking certified copies of document

(2) Taking certified sample of material

(3) Asking a question

(4) Inspection of work or document

46. 'थीन क्लाएंट' ही संकल्पना कशाशी संबंधित आहे ?
(1) संगणकाचे जाळे (2) विपणन व्यवस्था
(3) अर्थशास्त्र (4) वरीलपैकी नाही
The term 'Thin Client' is related to
(1) Computer Network (2) Marketing
(3) Economy (4) None of the above

47. आपल्या देशातील 24 × 7 चालणारी "क्रिटीकल इन्फोर्मेशन इन्फ्रास्ट्रक्चर प्रोटेक्शन" देणारी खालीलपैकी कोणती नोडल एजन्सी आहे ?
(1) सी.आय.आय.पी. (2) एन.सी.आय.पी.सी.
(3) सी.आय.पी.सी. (4) एन.सी.आय.आय.पी.सी.
Which of the following operates 24 × 7 as the nodal agency for "critical information infrastructure protection" in country ?
(1) CIIP (2) NCIPC
(3) CIPC (4) NCIIPC

48. इंटरनेट वरील संगणकाच्या ओळखी करीता देण्यात येणाऱ्या विशिष्ट क्रमांकास काय म्हटले जाते ?
(1) आय.पी अॅड्रेस (IP Address) (2) होम पेज (Home page)
(3) यू.आर.एल. (URL) (4) वरीलपैकी एकही नाही
The unique number that identifies computer on internet is called
(1) I.P. Address (2) Home page
(3) URL (4) None of the above

49. मीडिया लॅब एशिया चे खालीलपैकी कोणते टूल "अॅडाप्टीव लर्निंग सिस्टीम" मधे डिलीव्हरी मॉडेल फॉर कंटेट म्हणून वापरले जाते ?
(1) साहाय्यीका आणि शिक्षण (2) ई-शिक्षण
(3) ई-सहाय्यीका (4) ई-लर्निंग
Which of the following tool of Media lab Asia's is used as delivery model for content in "adaptive learning system".
(1) Sahayika and Shikshan (2) E-shikshan
(3) E-sahayika (4) E-learing

50. इंटरनेटचा वापर करून सेवा किंवा वस्तू थेट स्वतंत्र ग्राहकास विक्री करण्याच्या वाणिज्य प्रकाराला काय संबोधले जाते ?
(1) B2B विपणन (बी टू बी) (2) B2C विपणन (बी टू सी)
(3) C2B विपणन (सी टू बी) (4) इ-गव्हर्नन्स
Selling the product or service directly to the individual customer on Internet is called as
(1) B2B marketing (2) B2C marketing
(3) C2B marketing (4) e-governance

51. 18 वर्षा खालील मुलांना अश्लीलता, खोटेपणा, किंवा वैयक्तिक माहितीचा गैरवापर टाळण्यासाठी आय.टी. एक्ट, 2008 मधील ________ सेक्शन मदत करतो.

(1) 67 बी (2) 78 बी (3) 97 बी (4) 88 बी

To protect children below 18 years from pornography, stalking and make use of private information is prohibited with Section ______ of the IT Act, 2008.

(1) 67 B (2) 78 B (3) 97 B (4) 88 B

---

52. एच.टी.एम.एल (HTML) या संबोधनाचे पूर्ण रूप कोणते ?

(1) हायब्रीड टेस्ट मार्किंग लँग्वेज (Hybrid Test Marking Language)
(2) हायपर टेस्ट मार्किंग लँग्वेज (Hyper Test Marking Language)
(3) हायपर टेक्स्ट मार्कअप लँग्वेज (Hyper Text Markup Language)
(4) हायब्रीड टेक्स्ट मार्कअप लँग्वेज (Hybrid Text Markup Language)

The correct full form of HTML is

(1) Hybrid Test Marking Language
(2) Hyper Test Marking Language
(3) Hyper Text Markup Language
(4) Hybrid Text Markup Language

---

53. क्लाऊड सिस्टीमवर आधारित सी-डॅकने बनवलेली व मंथन अवार्ड मिळालेली __________ ही हेल्थ मॅनेजमेंट सिस्टीम आहे.

(1) मेघ सुश्रुत (2) ई-डॉक्टर (3) ई-सेवा (4) ई-सुश्रुत

Cloud based health management system developed by C-DAG which won the Manthan award is

(1) Megh Sushrut (2) E-Doctor (3) E-Seva (4) E-Sushrut

---

54. तुलनात्मक दृष्टया, खालीलपैकी कोणती नेटवर्क रचना (Network Topology) नेटवर्क उभारणीसाठी अधिक खर्चिक आहे ?

(1) स्टार (Star) (2) रिंग (Ring) (3) मेश (Mesh) (4) वरीलपैकी सर्व

Comparatively among the below, which Network Topology is the most expensive ?

(1) STAR (2) RING (3) MESH (4) All of the above

---

55. नेशनल इन्फोर्मेटीक्स सेंटर (NIC) ने बनवलेली लोकांच्या डिस्ट्रीब्युशन सिस्टीमसाठी सर्व समावेशक असलेली पब्लिक डिस्ट्रीब्युशन सिस्टीम ___________ या नावे ओळखली जाते.

(1) ई-पि.डी.एस. (2) ई-डि.एस. (3) ई-पी.डी. (4) यापैकी नाही

The Common Application Software for Public Distribution System, _________ is developed by National Informatics Center.

(1) E-PDS (2) E-DS (3) E-PD (4) None of the above

56. "भारतीय राज्यघटना ही संपूर्णत: संघराज्यात्मकही नाही आणि संपूर्णत: एकात्मही नाही, तर ती या दोघांचे मिश्रण आहे, ते एक वेगळ्या पद्धतीचे केन्द्रीत अथवा संयुक्त राज्य आहे. संघराज्यपद्धती असूनही राष्ट्राची आवड-निवड ही सर्वश्रेष्ठ असली पाहिजे, या तत्वाची ती जपवणूक करते" असे निरीक्षण कोणी नोंदले आहे ?

(1) के.सी. व्हिअर (2) सी.एच. अलेक्झंड्रेविक्स

(3) ग्रॅनव्हील ऑस्टीन (4) आयव्हर जेनिंग्ज

Who observed that "the Constitution of India is neither purely federal nor purely unitary but is a combination of both. It is a union or composite state of a novel type. It enshrines the principle that in spite of federalism the national interest ought to be paramount" ?

(1) K.C. Where (2) C.H. Alexandrowicz

(3) Granville Austin (4) Ivor Jennings

---

57. केन्द्राकडून राज्यांना निर्देश देण्याची कल्पना आपल्या घटनाकारांनी ________ कडून घेतली आहे.

(1) 1909 चा कायदा (2) 1919 चा भारत सरकार कायदा

(3) 1935 चा भारत सरकार कायदा (4) 1947 चा भारतीय स्वातंत्र्य कायदा

The idea of the union giving directions to the states was taken by the framers of our Constitution from the

(1) Act of 1909 (2) Government of India Act, 1919

(3) Government of India Act, 1935 (4) Indian Independence Act, 1947

---

58. 'नीति' आयोगा बाबत खालीलपैकी कोणते विधान बरोबर ***नाही*** ?

(1) नियोजन आयोगाच्या काळात असलेले "केन्द्र ते राज्य" असे जे एकतर्फी धोरण होते त्याची जागा आता राज्यांची खरी आणि निरंतर भागीदारी घेईल.

(2) नीति आयोग हा "विचार कुंभ" म्हणून पुढे येईल.

